राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३६ / २०२५ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सौरभ महादेव शिंदे	प्र. सह. दुय्यम निबंधक वर्ग-१, सह दुय्यम निबंधक वर्ग(२) हवेली क्र.०३ पुणे, हडपसर, पुणे.	सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे.

(सुनावणी दिनांक - १७ / ०३ / २०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. ०३.०१.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दिनांक	माहितीचा तपशील
०३.०७.२०२४	दस्त ऐवज क्रमांक ६४२७ / १९९६ ची प्रत मिळण्याबाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ३१.०७.२०२४ रोजीच्या पत्राने मागणी केलेला दस्तऐवज क्र. ६८२७ / १९९६ चा शोध घेण्याचे काम दररोज कार्यालयीन अभिलेखात सुरु आहे. तरी देखील अद्यापही सदर दस्तऐवज आढळुन आले नाही, सदर दस्तऐवज आढळुन आल्यानंतर तात्काळ प्रमाणित प्रत देण्यात येईल," असे कळविले आहे.

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, "जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ३१.०७.२०२४ रोजीच्या पत्राने मागणी केलेला दस्तऐवजचा शोध घेण्याचे काम कार्यालयीन अभिलेखात सुरु आहे. तरी अद्याप दस्तऐवज आढळुन आले नाही, आढळुन आल्यानंतर तात्काळ प्रामाणित प्रत देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. १३.१२.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयातील दस्तांचा शोध घेऊन अपिलार्थीस तीन आठवड्यात देण्यात यावे," असा निर्णय पारित केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उत्तर दिल्याचे दिसुन येत आहे. प्रस्तुत प्रकरणी नियमाप्रमाणे कार्यवाही झाली आहे. अपिलार्थी गैरहजर असल्याने त्यांचे म्हणणे एकुन घेता आले नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३६ / २०२५ / पुणे 2623/2026 दिनांक - 5/6/2026.